

शिवाजीनगर : हुतात्मा बालवीर शिरीषकुमार विद्यालयात घेतलेल्या चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांनी काढलेली चित्रे.

# चित्रकलेत सूरज कांबळे प्रथम

एक्सायटिंग सायन्स ग्रुपच्या (ईएसजी) वतीने आंतरशालेय चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत महापालिकेच्या आठ विद्यानिकेतन शाळांमधील १०२ विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेत बाबू जगजीवन शाळेतील सूरज कांबळे याने प्रथम क्रमांक पटकावला आहे.

'ईएसजी' तर्फे 'विज्ञान आणि कला' यावर आधारित ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी चित्रकार रवी परांजपे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वय गायत्री क्षीरसागर यांनी केले. 'विज्ञान प्रयोगशाळेत एक दिवस', 'पाण्याशिवाय जग', 'माझ्या स्वप्नातील कार' असे विषय स्पर्धेसाठी दिले होते. स्पर्धेत लक्ष्मण प्रजापती (अहिल्यादेवी होळकर शाळा) आणि प्राची वल्ला (केसीटी) यांनी द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले, तर सलिल उजागरे (डॉ. वसंतदादा पाटील शाळा) याला तृतीय क्रमांकाचे बक्षीस मिळाले. जयंती पाटील यांनी या स्पर्धेचे परीक्षण केले.

परांजपे म्हणाले, "विद्यार्थ्यांनी आपली प्राचीन कला शिकण्यावर भर द्यावा आणि त्यातून आपली स्वत:ची शैली विकसित करावी. यामुळे नावीन्यपूर्ण कलाकृती साकारण्यास मदत होईल. मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रयत्न करावेत." विज्ञान व कला यावर आधारित असलेली ही चित्रकला स्पर्धा महापालिकेच्या शाळांमध्ये पहिल्यांदाच आयोजित करण्यात आल्याचे क्षीरसागर यांनी सांगितले.